पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: २२/०७/२०२०**

# गडचिरोली पोलीस दलाच्या ११ बहादुर जवानांना वेगवर्धित पदोन्नती बहाल

- **मा. पोलीस अधीक्षक सो. यांच्याकडून जवानांचे अभिनंदन**

नक्षलविरोधात उत्कृष्ट व दैदीप्यमान कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वेगवर्धित पदोन्नती बहाल करण्यात येते. त्यानुसार आज रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक नक्षलविरोधी अभियान, नागपूर यांच्या कार्यालयामार्फत नक्षलवाद्यांविरोधात उत्कृष्ट कामगिरीची नोंद करणाऱ्या ११ जवानांना वेगवर्धित पदोन्नती बहाल करण्यात आली.

वेगवर्धित पदोन्नती बहाल करण्यात आलेल्या जवानांमध्ये पोहवा/१९६९ प्रभुदास पांडुरंग दुग्गा यांची सहायक फौजदार पदी, नापोशि/३१०८ संतोष विजय पोटावी, नापोशि/२६२० बापू रामु गोटा, नापोशि /२७२३ निलेश्वर देवाजी पदा, नापोशि/३०४८ बालाजी जयराम कन्नाके यांची पोलीस हवालदार पदी, पोशि/३७८३ अविनाश कवडो, पोशि/१८९२ मोगलशाह मडावी, पोशि/१०८६ श्रीनिवास सत्यनारायण संगोजी, पोशि/५६३७ अशोक शंकर कुलसंगे, पोशि/५६५६ रुषी डोलु विडपी, पोशि/२४४१ अशोक पांडु मज्जी यांची पोलीस नाईक पदी वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी वेगवर्धित पदोन्नती प्राप्त सर्व जवानांचे अभिनंदन केले आहे.